INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November-2018 Special Issue – LXXIII

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCHJOURNEY

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 58 | मारुती चितमपल्ली यांच्या 'चकवाचांदण' आत्मचरित्रातील वनवैविध्य | प्रा. सचिन पाटील | 301 |
| 59 | लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य:एक अनुबंध | डॉ.अनिल गर्जे | 304 |
| 60 | भारतीय लोकशाहीची पायाभरणी आणि ब्रिटीशकालीन कायदे-एक अभ्यास | डॉ.संभाजी पाटील | 309 |
| 61 | पंचवार्षिक योजनेमध्ये गृहनिर्माण धोरण | प्रा. नरेश इंगळे | 314 |
| 62 | जनाबाईचे अभंग:एक अभ्यास | डॉ.प्रवीण कारंजकर | 319 |
| 63 | केशवसुत संप्रदायाची कविता | डॉ.भूषण बंड | 323 |
| 64 | विनोबा – जमनालाल बजाज संबंध | डॉ.दीपक लोणकर | 328 |
| 65 | उत्तम कांबळे यांच्या साहित्याच्या प्रेरणा | प्रा.माधव सूर्यवंशी | 332 |
| 66 | बचत गट आणि महिला सक्षमीकरण | प्रा.डी.चंद्रकांत मोरे | 336 |
| 67 | सरदार कदमबांडे घराण्याचा संक्षिप्त परिचय | डॉ.शिवाजी वाघमोडे | 339 |
| 68 | आंतरराष्ट्रीय राजकारणावरील अशासकीय संघटनांचा वाढता प्रभाव : राष्ट्रासाठीचे आव्हान | डॉ. दिलीपसिंह निकुंभ | 343 |
| 69 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील सामाजिक,सांस्कृतिक व राष्ट्रीय विचार | प्रा.एस.आर.खैरनार | 351 |
| 70 | भारतीय संविधानाचे शिल्पकार : डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा.विनय वाघ व डॉ.सुरेंद्र मोरे | 355 |
| 71 | पुनर्विचार : काही प्रश्नांचा धांडोळा | प्रा. लालबा हुमटकर | 361 |
| 72 | नव्वदोत्तर विदर्भातील शेतकरी चळवळीच्या नेतृत्वाचे समीक्षात्मक अध्ययन | प्रा.राजू लिपटे | 364 |
| 73 | भंडारा जिल्ह्यातील तापमानातील बदलाचा पर्यावरणीय अभ्यास | प्रा.श्रावण कापगते | 367 |
| 74 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री नायिकांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.शरद गायकवाड | 373 |
| 75 | प्रवरेचा भगीरथ पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील | डॉ. चंद्रकांत रुद्राक्षे | 377 |
| 76 | तणाव : मनातील द्वंद्वाचा अविष्कार | डॉ. मनीषा मुलकलवार व डॉ. प्रमोद मुलकलवार | 382 |
| 77 | भारतीय लोकशाही : पंचायतराज | डॉ.एन.डी.आघाव | 386 |
| 78 | राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री संरक्षणासाठी केलेले कायदे | डॉ. डी.एम. चौधरी | 390 |
| 79 | भारतीय लोकशाही प्रणाली आणि प्रांतवाद | डॉ. अरुण शेळके | 394 |
| 80 | तापलेले दिवस : आत्मशोधातून आलेली कविता | प्रा. हेमंतकुमार बागडे | 400 |
| 81 | आदिवासींचे वीर | डॉ. अंजली मस्करेन्हस | 404 |
| 82 | ई-ग्रंथालय डी. एड् प्रशिक्षणार्थ्यासाठी अद्यावत शिक्षण व प्रशिक्षण घेण्यासाठी प्रभावी उपाय | प्रा. डॉ.दादासाहेब पवार | 409 |
| 83 | रामनाथ चव्हाण यांची कादंबरी 'निळी पहाट' | प्रा. गौतम बनसोडे | 412 |
| 84 | अश्वघोषाच्या साहित्यातील बौद्ध तत्त्वज्ञान | श्रीमती बकुल कांबळे | 418 |
| 85 | जागतिकीकरणाच्या प्रभावातील १९९० नंतरची मराठी कादंबरी | प्रा. प्राची जोशी | 426 |
| 86 | अण्णाभाऊंच्या साहित्यातील सामाजिक विचार | डॉ. प्रल्हाद होंडे | 435 |
| 87 | भारतीय राज्यघटनेचा सरनामा : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 438 |
| 88 | नव्वदोत्तर कथालेखकांच्या कथांतील आशयसूत्रे | डॉ. सहदेव चव्हाण | 445 |
| 89 | औरंगाबाद जिल्ह्यातील जलप्रणाली | डॉ. तुकाराम गजर | 450 |
| 90 | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विस्ताराची व्यूह रचना | प्रा. प्रदीप जगताप | 453 |





Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विस्ताराची व्यूहरचना – विशेष संदर्भ जातीय समिकरणे

प्रा. प्रदीप जगताप
दादा पाटील महाविद्यालय,
कर्जत.जि. अहमदनगर
मो. नं. ९९२३०६८१७३
jpradeep.sonu@gmail.com.

**प्रस्तावना**

संसदीय लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षांना अनन्यसाधारण महत्व असते. ज्या राजकीय पक्षाला बहुमत मिळते तो पक्ष सत्तारूढ राजकीय पक्ष बनतो आणि ज्या राजकीय पक्षाला पाठींबा कमी प्रमाणात मिळतो तो पक्ष विरोधी पक्षाची भूमिका पार पडतो. राजकीय सत्तास्पर्धेच्या काळात राजकीय पक्षांना जबाबदारीने व कार्यक्षमतेने कार्य करावे लागते. प्रत्येक राजकीय पक्ष आपला विस्तार करण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यासाठी तो विविध व्यूहरचना तयार करतो. त्यापैकी जातीय समीकरण हे एक आहे. राजकारणात विविध आधारापैकी जात हा एक आधार आहे. या आधाराचा वापर राजकीय पक्षाकडून केला जातो. त्यास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षही अपवाद नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आपल्या विस्तारासाठी किंवा आपला सामाजिक पाया विस्तारण्यासाठी कोणकोणत्या जातीय संघटनांशी जुळवून घेतले आहे व त्याचा पक्षाला कशा पद्धतीने फायदा झाला आहे. यांचा अभ्यास सदर शोधनिबंधात करण्यात आला आहे.

'जात हा भारतातील राजकीय प्रक्रियेतील एक महत्वाचा घटक आहे. जातीव्यवस्थेतील विषमतेमुळे सत्तावाटपदेखील विषम पद्धतीने होते. कनिष्ठ जातींना स्वातंत्र्यानंतरच्या काळातही सत्तेपासून दूर राहावे लागले. तर उच्च जातींनी आपल्या जातीय स्थानाच्या आधारे सत्तेचा जास्तीत जास्त वाटा मिळविण्याचे प्रयत्न केले. तरीही निवडणुका आणि लोकशाही पद्धतीचे राजकारण यांचा जातींवर परिणाम झालाच. जात हे राजकीय संघटनाचे एक साधन बनले. यामुळेच रजनी कोठारींनी जातींचे राजकीयीकरण होत असल्याचा निष्कर्ष १९७१ मध्ये काढला होता. स्वातंत्र्योत्तर राजकारणावर प्रामुख्याने वरिष्ठ जातींचाच पगडा राहिला. लोकशाही चौकटीत देखील आपले वर्चस्व कायम ठेवण्यात वरिष्ठ जाती बराच काळ यशस्वी झाल्या.' (पळशीकर सुहास, १९९८:४)

'महाराष्ट्राचे राजकारण मराठा वर्चस्वासाठी प्रसिद्ध आहे. १९६० नंतर महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा नेत्यांची पकड कशी राहिली याचे अनेक अभ्यास झाले आहेत. जयंत लेले यांनी मराठा वर्चस्वाचा ऐतिहासिक मागोवा घेऊन वासाहतिक काळाच्याही आधीपासून मराठा समाजात जातिभान आणि नेतृत्वाची महत्वकांक्षा कशी होती हे दाखविले आहे. तसेच महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मराठा नेतृत्वाने कोणत्या व्यूहरचनेच्या आधारे आपले बस्तान बसविले आणि कोणते भौतिक हितसंबंध जपले याचाही अभ्यास जयंत लेले यांनी केला आहे. महाराष्ट्रभर पसरलेल्या मराठा जातिसमूहाचे प्रमाण वेगवेगळया भागात कमीअधिक आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या भागांत मराठा–कुणबी समूह मोठया प्रमाणावर आढळतो. पण सर्व महाराष्ट्रभर अस्तित्व असणे हे त्याचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. पूर्वापार हा समूह शेतीच्या व्यवसायात गुंतलेला आहे, तसेच गावपातळीपासून राजकीय अधिकार गाजवणारा समूह म्हणून मराठा समाजाकडे पाहिले जाते. या जातीसमूहातील एका मोठया गटाचा 'आपण क्षत्रिय आहोत' असा दावा आहे आणि क्षत्रियत्वाचे आकर्षण हे या गटाचे एक वैशिष्ट्य आहे.'(पळशीकर सुहास, १९९८:७–८)



Scanned with CamScanner

'दिर्घकाळाच्या मराठा धुरीणत्वाच्या राजकारणानंतर १९७० च्या दशकापासून कॉग्रेसच्या संघटनांतर्गत विसंगती डोके वर काढू लागल्या. यातून मुख्यत: यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाचे जे प्रारूप होते त्यानुसार राजकारण करणाऱ्या गटांना कॉग्रेसमधून बाहेर पडणे भाग पडले. पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र हेच या सगळया घडामोडींचे केंद्र होते. म्हणूनच मराठा समाजाची ऐतिहासिक वाटचाल, सत्ताकांक्षा, धुरीणत्व आणि त्याला मिळालेली आव्हाने यांची पार्श्वभूमी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या उदयाला व वाटचालीला लाभली आहे.' (पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, २०११:५३)

शरद पवारांनी १९७८ मध्ये 'समाजवादी कॉग्रेस' हा पक्ष स्थापन केला. दक्षिण महाराष्ट्रातील मराठा नेतृत्वाकडे राज्याची सत्ता राहावी म्हणूनही समाजवादी कॉग्रेसची स्थापना झाल्याचे निरीक्षण नोंदवले जाते. मात्र मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासारख्या निर्णयाने मराठा मतदार समाजवादी कॉग्रेसवर नाराज झाला. असे असले तरी मराठा वर्चस्व आणि महाराष्ट्राचे वैशिष्टयपूर्ण राजकारण टिकवण्यासाठी इंदिरा गांधींच्या नेतृत्वाशी थेट दोन हात करण्याची भूमिका शरद पवारांनी घेतली. या घडामोडीतून स्वातंज्योत्तर काळात प्रथमच मराठा नेतृत्वात फूट पडली. त्यातच १९८० पासून इंदिरा गांधींनी मराठा नेतृत्वाला वारंवार माघार घेण्यास भाग पाडले. राज्याच्या राजकारणामधील मराठा नेत्यांचे स्थान कमी झाले. मराठा नेतृत्वाला अमान्या असलेले अंतुले, बॅ. भोसले, शंकरराव चव्हाण हे नेते कॉग्रेसचे नेते बनले थोडक्यात,१९८० च्या दशकात मराठा कार्यकर्ते कॉग्रेस (इंदिरा), कॉग्रेस (एस), शेतकरी संघटना, शिवसेना अशा विविध – ठिकाणी, विविध गटांमध्ये विखुरले गेले. मराठा नेतृत्वातील फूट आणि त्या नेतृत्वाची दुर्बलता या दोन्ही गोष्टी १९९० च्या दशकातही कायम राहिल्या. १९९५ नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणात संख्यात्मक दृष्टया मराठा समाजाचे अस्तित्व शिल्लक राहिले पण गुणात्मक दृष्टया मराठा समाजाचे अस्तित्व महाराष्ट्राच्या राजकारणात नगण्य होत चालल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर मा. शरद पवारांनी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाची स्थापना केल्याचे दिसते.

'१९९५–१९९९ या कालावधीत दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी धोक्यात आली. भाजप – शिवसेना युतीने त्या दृष्टीने आपला हातभारही लावला. साखर कारखान्यांची चौकशी करणे, निवडणुक पद्धती बदलणे अशा अनेक धोरणांमुळे कारखानदारांच्या हितसंबंधांना धक्का पोहोचला. शिवसेनेत ४५ मराठा आमदार असूनही सत्तेची सूत्रे मराठा नेतृत्वाकडे नव्हती. ग्रामीण भागातील श्रीमंत शेतकरी जातीही अस्वस्थ होत्या. मराठा जातीमधील ही फूट शिवसेनेला फायदेशीर ठरत होती. महाराष्ट्राच्या बदलत्या अर्थव्यवस्थेत शेतकरी जातीचे महत्व कमी होऊ लागले होते. या पार्श्वभूमीवर मा.शरद पवारांनी सोनिया गांधींना विरोध करत १० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाची स्थापना केली.'(पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास,२०११:५६–५७) मराठा समाजातील नेतृत्वाला कॉग्रेस सरकारच्या तुलनेत शिवसेना – भाजप च्या सरकारमध्ये सत्तेत वाटा कमी होता. शिवसेना – भाजप युतीच्या काळात मराठा कॅबिनेट मंत्र्यांची संख्या फक्त चार होती. त्यामुळे हळूहळू राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाकडे मराठा समाजातील सत्ताकांक्षी स्थानिक नेत्यांचा मोठा वर्ग वळू लागला व राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष राज्यातील प्रमुख पक्ष बनण्याच्या दिशेने वाटचाल करू लागला. प्रबळ मराठा जातीचा पक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाला ओळखले जाते. (बिरमल नितीन, १९९९)

मराठा जातीतील पाठींबा राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाला कसा होता हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होईल.



Scanned with CamScanner

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आमदारांची जातिगटानुसार वर्गवारी

| जातिगट | निवडणूक वर्ष | | |
|---|---|---|---|
| | १९९९ | २००४ | २००९ |
| मराठा | ३४ | ३७ | ३४ |
| कुणबी | ०२ | ०४ | ०१ |
| ओबीसी | ०३ | १० | १२ |
| दलित | ०३ | ०४ | ०७ |
| आदिवासी | ०४ | ०७ | ०४ |
| मुस्लिम | ०२ | ०४ | ०२ |
| इतर | १० | ०५ | ०२ |
| एकूण | ५८ | ७१ | ६२ |

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या मतदारांची जातिगटानुसार वर्गवारी

| जातिगट | निवडणूक वर्ष | | |
|---|---|---|---|
| | १९९९ | २००४ | २००९ |
| मराठा | ३२ | ३९ | २७ |
| कुणबी | १६ | ०५ | ०३ |
| इतर ओबीसी | २० | १७ | २२ |
| दलित | ०८ | ०८ | १३ |
| आदिवासी | ०४ | १७ | १६ |
| इतर | २० | १४ | २० |

( पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास,२०११:६०)

महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा लॉबीचा प्रभाव आढळत असला तरी महाराष्ट्रात उच्च जाती, मराठा–कुणबी, इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मुस्लिम आणि अमराठी यांचेही महत्व आहे.त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्ष या जातवार मतदारांचा पाठींबा मिळविण्यासाठी नेहमी



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
November-2018

प्रयत्नशील असतात. त्याचप्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेसनेही आपला सामाजिक आधार विस्तारण्यासाठी विविध जातीगटांना आपल्या बरोबर घेण्याचा प्रयत्न केला आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष मा. शरद पवार हे यशवंतराव चव्हाणांचे वारसदार मानले जातात. यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणाचे अनुकरण शरद पवार यांनी तंतोतंत केल्याचे दिसते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना झाल्याबरोबर दलित मतदारांना आपलेसे करण्यासाठी शरद पवार यांनी दलितांचा असणारा पक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया – आठवले गट यांच्या बरोबर युती केली. आंबेडकरी चळवळीला आपलेसे करण्यासाठी सामाजिक समरसतेची भूमिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने घेतली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने दलित मतांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आठवले गटाबरोबर युती १९९९ मध्ये केली, त्यामुळे १९९९, २००४ च्या विधानसभा व लोकसभेच्या निवडणुकीत यशामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला दलित मतांचा पाठींबा मिळाल्याचे दिसते. मात्र एप्रिल–मे २००९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस – राष्ट्रवादीतील मराठा नेत्यांच्या असहकार्यामुळे आपला शिर्डी लोकसभा मतदारसंघातून पराभव झाला, अशी रामदास आठवले यांची भावना झाल्याने त्यांनी वीस वर्षापासूनचे शरद पवारांशी असलेले सहकार्य तोडून रिपाइं ऐक्यासाठी आणि तिसऱ्या आघाडीसाठी पुढाकार घेतला, त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाबरोबर असणारी रिपब्लिकन पक्षाची (आठवले गट) युती संपुष्टात आली.

'राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षा अंतर्गत प्रत्येक नेत्याचे एक–एक संस्थान आहे, या प्रत्येक नेत्याचा एकेका जिल्हयात जातीमुळे किंवा सहकारी संस्थांमुळे स्वत:चा प्रभाव आहे. त्यांचा हा प्रभाव त्या त्या मतदारसंघात पक्षाच्या दृष्टीने महत्वाचा असतो. पक्षांशी जोडलेल्या जातींच्या संघटनाही त्या त्या जातीत काम करतात व त्या त्या जातिसमूहांना पक्षाशी जोडून घेतात. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आपला सामाजिक पाया विस्तारण्यासाठी ओबीसी नेत्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. ओबीसी नेत्यांना, त्यांच्या जात संघटनांना आपलेसे करण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने केला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते व त्यांच्याशी संबंधित जातीय संघटना पुढीलप्रमाणे.

१. श्री. छगन भुजबळ – महात्मा फुले समता परिषद
२. श्री. मधुकर पिचड – आदिवासी विकास महासंघ
३. श्री. सुजित झिमण – कुणबी परिषद
४. श्री. लक्ष्मण ढोबळे – बहुजन रयत परिषद
५. श्री. विनायक मेटे – शिवसंग्राम परिषद
६. श्री. वसंत चव्हाण – अंत्योदय परिषद
७. श्री. गणेश नाईक – शिवशक्ती परिषद
८. श्री. प्रकाश शेंडगे – यशवंत सेना
९. श्री. मधुकर कांबळे –अखिल भारतीय मातंग परिषद
१०.श्री. लक्ष्मण माने – भटके विमुक्त जाती महासंघ
११.श्री. विजय कांबळे, राम पांडागळे, कामा खंबाळकर – राष्ट्रीय बौद्ध परिषद
१२.श्री. जयदत्त क्षीरसागर – अखिल भारतीय तेली महासंघ


Scanned with CamScanner

वरील संघटनांच्या माध्यमातून प्रत्येक नेत्याने पक्षाबाहेर आपले प्रभावक्षेत्र तयार केले आहे, व ते पक्षाची ताकद वाढविण्यासाठी पक्षाला उपलब्ध करून दिले आहे. ( पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, २०११:६७–६८)

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला आपला सामाजिक पाया विस्तारित करण्यासाठी मदत करणाऱ्या विविध जातीय संघटना व त्यांचे सविस्तर स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे

**महात्मा फुले समता परिषद**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी संबंधित असणारी महत्वाची सामाजिक संघटना म्हणून महात्मा फुले समता परिषदेला ओळखले जाते. महात्मा फुले समता परिषद ही माळी समाजाची संघटना म्हणून ओळखली जाते. महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून छगन भुजबळ यांनी माळी समाजाला एकत्र केले आहे. त्याचबरोबर इतर मागासवर्गीय जातीचेही संघटन त्यामध्ये करण्याचा प्रयत्न छगन भुजबळ यांनी केला आहे. त्यामध्ये शिंपी, गुरव, न्हावी, कुंभार, सुतार, सोनार, कासार, परीट, कसाई, फुलमाळी यांचा समावेश होतो. महात्मा फुले समता परिषद ही संघटनात्मकरित्या काम करते. प्रदेश, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर तिच्या शाखा निर्माण केलेल्या आहेत. आपल्या समाजाचे हितसंबंध जपणे, मेळावे घेणे, विविध कार्यक्रम घेणे अशी कामे या संघटनेमार्फत केली जातात.

महात्मा फुले समता परिषदेचे अध्यक्ष मा.श्री. छगन भुजबळ आहेत. त्याचबरोबर जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष अशी यंत्रणा आहे. महात्मा फुले समता परिषद महाराष्ट्रभर कार्यरत असली तरी तिचा अधिक प्रभाव पश्चिम महाराष्ट्रात त्यामध्येही नाशिक जिल्हयात जास्त आहे, त्यातूनच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे छगन भुजबळ, पंकज भुजबळ, समीर भुजबळ निवडुन आलेले दिसतात. त्यांच्या विजयामध्ये महात्मा फुले समता परिषदेचा वाटा महत्वाचा आहे. महात्मा फुले समता परिषद राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना सहकार्य करून त्यांना विजयी करण्याचे प्रयत्न करते. त्याचबरोबर महात्मा फुले समता परिषद इतर मागासवर्गीयांचे नेतृत्व करण्याचे प्रयत्न करते. त्यामुळेच मा. शरद पवार यांनी १९९९ मध्ये आघाडी सरकारमध्ये मा. छगन भुजबळ यांना उपमुख्यमंत्री पदावर नेमले होते.(समता परिषद वार्षिक अहवाल २०१३)

**आदिवासी विकास महासंघ**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी संबंधित असणारी दुसरी महत्वाची संघटना म्हणजे आदिवासी विकास महासंघ होय. आदिवासी विकास महासंघाच्या माध्यमातून महादेव कोळी, ठाकर, भिल्ल, कातकरी, लंगोली, परदेशी, मदार या आदिवासी जाती एकत्र आल्या आहेत. आदिवासी विकास महासंघाची संघटनात्मक यंत्रणा प्रदेश, विभागीय, जिल्हा, तालुका, गाव पातळीवर कार्यरत आहे, त्याचबरोबर या संघटनेमध्ये युवक सेल, महिला सेल, शेतकरी सेल असे सेलही आहेत. आदिवासी विकास महासंघाचे अध्यक्ष मा.श्री. मधुकर पिचड हे आहेत.

आदिवासी विकास महासंघ महाराष्ट्रभर कार्यरत असला तरी त्याचा प्रभाव अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यात जास्त आहे. कारण आदिवासी विकास महासंघाचे अध्यक्ष मधुकर पिचड हे अकोल्याचे आहेत. मधुकर पिचड यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही २००९ ते २०१३ या कालावधीत काम केले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार आणि आदिवासी विकास महासंघाचे प्रतिनिधी अकोले विधानसभा निवडणुकीत विजयी झालेले आहेत. आदिवासी विकास महासंघ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठींबा देवून त्यांना विजयी करण्यासाठी प्रयत्न करतो.(आदिवासी विकास महासंघ वार्षिक अहवाल २०१४)



Scanned with CamScanner

**कुणबी परिषद**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी संबंधित असणारी महत्वाची संघटना म्हणजे कुणबी परिषद ही एक होय. कुणबी परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कुणबी समाजाला एकत्र करण्याचा प्रयत्न अॅड. सुजित झिमण यांनी केला. कुणबी परिषदेमध्ये प्रदेशाध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, गावचा अध्यक्ष अशी संघटनात्मक यंत्रणा आहे असे असले तरी कुणबी परिषदेचा प्रभाव महाराष्ट्रभर नाही. रत्नागिरी जिल्हयातील दापोली मध्ये कुणबी परिषद प्रभावी आहे. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार संजय कदम यांच्या विजयात कुणबी परिषदेचा मोठा वाटा आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठींबा देण्याचे काम कुणबी परिषद करते आहे. कुणबी परिषदेचे अध्यक्ष अॅड. सुजित झिमण हे आहेत.

**बहुजन रयत परिषद**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांशी संबंधित असणारी महत्वाची संघटना म्हणजे बहुजन रयत परिषद होय. बहुजन रयत परिषदेचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मण ढोबळे हे आहेत. त्यांनी बहुजन रयत परिषदेच्या माध्यमातून अनुसूचित जातींचे संघटन केले आहे. त्याचबरोबर विविध शैक्षणिक संस्थातून आपला संस्थात्मक आधार मजबूत केला आहे. बहुजन रयत परिषदेची संघटनात्मक यंत्रणा आहे. प्रदेशाध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष अशी यंत्रणा आहे.

बहुजन रयत परिषद महाराष्ट्रभर कार्यरत असली तरी तिचा प्रभाव सोलापूर जिल्हयात जास्त आहे. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून बहुजन रयत परिषदेचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मण ढोबळे मोहोळ मतदार संघातून निवडून आले होते. तसेच सोलापूर जिल्हयातील निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठींबा देण्याचे काम बहुजन रयत परिषदेने केले आहे.

**शिवसंग्राम परिषद**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी संबंधित संघटना म्हणजे शिवसंग्राम परिषद होय. शिवसंग्राम ही मराठा समाजाची संघटना आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही परिषदेची मुख्य मागणी आहे. शिवसंग्राम परिषदेची रचना संघटनात्मक आहे. यामध्ये प्रदेश विभाग, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, सचिव अशी यंत्रणा आहे. त्याचबरोबर शिवसंग्राम परिषदेमध्ये युवक सेल, महिला सेल, शेतकरी सेल, शिक्षक सेल, कामगार सेल कार्यरत आहेत. शिवसंग्राम परिषदेचे अध्यक्ष श्री. विनायक मेटे हे आहेत.

शिवसंग्राम परिषद महाराष्ट्रभर कार्यरत असली तरी ती बीड जिल्हयात अधिक प्रभावी आहे. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रतिनिधी म्हणून शिवसंग्राम परिषदेचे अध्यक्ष विनायक मेटे निवडून आले होते. महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठींबा देण्याचे काम २०१४ पर्यत शिवसंग्राम परिषदेने केले होते, मात्र २०१४ च्या लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने मराठा आरक्षणाची भूमिका स्पष्ट न केल्यामुळे शिवसंग्राम परिषदेने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची साथ सोडली आहे. ( शिवसंग्राम परिषद वार्षिक अहवाल २०१४)

**अंत्योदय परिषद**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांशी संबंधित एक महत्वाची संघटना म्हणजे अंत्योदय परिषद होय. मा. वसंत चव्हाण यांनी या संघटनेची स्थापना केली. या परिषदेच्या माध्यमातून राष्ट्रवादी कॉंग्रेसला पाठींबा देण्याचे काम



Scanned with CamScanner

वसंत चव्हाण यांनी केले. मात्र अंत्योदय परिषदेचे अध्यक्ष वसंत चव्हाण यांच्या निधनानंतर या परिषदेचे काम विस्कळीत झाले आहे.

### शिवशक्ती परिषद

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांशी संबंधित एक महत्वाची संघटना म्हणजे शिवशक्ती परिषद होय. शिवशक्ती परिषदेच्या माध्यमातून वंजारी समाजाचे संघटन मा.श्री. गणेश नाईक यांनी केले आहे. शिवशक्ती परिषदेची संघटनात्मक यंत्रणा आहे. प्रदेश, जिल्हा, तालुका, गाव पातळीवर ही संघटना काम करते. संघटनेमध्ये युवक सेल, महिला सेल, कामगार सेल आहेत. शिवशक्ती परिषदेचे अध्यक्ष हे मा.श्री. गणेश नाईक हे आहेत.

शिवशक्ती परिषद महाराष्ट्रभर कार्यरत असली तरी नवी मुंबईमध्ये ती अधिक प्रमाणात प्रभावी आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये गणेश नाईक यांचे वर्चस्व आहे. २००४, २००९, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार नवी मुंबईतून विजयी झाले. त्यामध्ये शिवशक्ती परिषदेचा मोठा वाटा आहे. तसेच इतर स्थानिक निवडणुकांमध्येही शिवशक्ती परिषदेने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

### यशवंत सेना

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांशी संबंधित एक महत्वाची संघटना म्हणजे यशवंत सेना होय. यशवंत सेनेच्या माध्यमातून धनगर समाजाचे संघटन करण्यात आले आहे. यशवंत सेनेची संघटनात्मक यंत्रणा आहे. प्रदेश, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर ही संघटना कार्यरत आहे. यशवंत सेनेमध्ये युवक सेल, महिला सेल, शिक्षक सेल, शेतकरी सेल कार्यरत आहेत. मा. प्रकाश शेंडगे हे यशवंत सेनेचे अध्यक्ष आहेत.

यशवंत सेना महाराष्ट्रभर कार्यरत असली तरी तिचा अधिक प्रभाव सांगली जिल्हयात आहे. सांगली जिल्हयातील यशामध्ये यशवंत सेनेचा मोठा वाटा आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत जत मतदार संघातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून यशवंत सेनेचे अध्यक्ष पराभूत झाले. त्यापूर्वी काही काळ यशवंत सेनेने भाजपाला पाठींबा दिला होता. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यशवंत सेनेने राष्ट्रवादी कॉंग्रेसला पाठींबा दिला आहे. ( यशवंत सेना वार्षिक अहवाल २०१४)

### अखिल भारतीय मातंग परिषद

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी संबंधित एक महत्वाची संघटना म्हणजे अखिल भारतीय मातंग परिषद होय. अखिल भारतीय मातंग परिषदेच्या माध्यमातून मातंग समाजाचे संघटन करण्यात आले आहे. अखिल भारतीय मातंग परिषदेची संघटनात्मक यंत्रणा आहे. प्रदेश, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर ही परिषद कार्यरत आहे. अखिल भारतीय मातंग परिषदेमध्ये युवक सेल, महिला सेल, कामगार सेल कार्यरत आहेत. श्री. मधुकर कांबळे हे अखिल भारतीय मातंग परिषदेचे अध्यक्ष आहेत.

महाराष्ट्रातील बहुतांश शहरे व ग्रामीण भागात अखिल भारतीय मातंग परिषद कार्यरत आहे. तिचा प्रभाव हा कमी जास्त प्रमाणात महाराष्ट्रभर आहे. मातंग समाजाची मते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडे वळविण्यात या परिषदेचा वाटा आहे. या परिषदेने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाबरोबर राहून निवडणुका लढविल्या आहेत.

### भटके विमुक्त जाती महासंघ

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी संबंधित एक महत्वाची संघटना म्हणजे भटके विमुक्त जाती महासंघ होय. भटके विमुक्त जाती महासंघामध्ये बेरड, वडारी, कैकाडी, वंजारभट, वंजारी, बहुरूपी, भोई, भराडी, घिसाडी,



Scanned with CamScanner

गोंधळी, गोसावी, जोशी, कोल्हाटी, नंदीवाले, वैदू, शेगर धनगर, वैरागी, राऊळ, बेलदार आणि लोहार जातीमधील लोकांचे संघटन करण्यात आले आहे. या जातीमधील लोकांना एकत्रित करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्याचे काम भटके विमुक्त जाती महासंघ करीत आहे, यामध्ये प्रदेश, विभागीय, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर यंत्रणा तयार करण्यात आली आहे. भटके विमुक्त जाती महासंघामध्ये युवक सेल, महिला सेल, शेतकरी सेल ही आहेत. भटके विमुक्त जाती महासंघाचे अध्यक्ष मा. शरद पवार असून कार्याध्यक्ष म्हणून लक्ष्मण माने काम करीत आहेत. भटके विमुक्त जाती महासंघ हा सातारा जिल्हयात अधिक प्रभावी आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सातारा जिल्हयातील विजयामध्ये भटके विमुक्त जाती महासंघाचे योगदान महत्वाचे राहिलेले आहे.

**राष्ट्रीय बौद्ध परिषद**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांशी संबंधित एक महत्वाची संघटना म्हणजे राष्ट्रीय बौद्ध परिषद होय. राष्ट्रीय बौद्ध परिषदेच्या माध्यमातून बौद्ध समाजातील लोकांचे संघटन करण्यात आले आहे. राष्ट्रीय बौद्ध परिषदेची संघटनात्मक यंत्रणा आहे. ही संघटना विभाग, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर कार्यरत आहे. राष्ट्रीय बौद्ध परिषदेचे अध्यक्ष श्री. विजय कांबळे आहेत. महाराष्ट्रातील जवळपास सर्वच शहरी व ग्रामीण भागात राष्ट्रीय बौद्ध परिषदेने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाबरोबर राहून स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व लोकसभा या निवडणुका लढविल्या आहेत.

**अखिल भारतीय तेली महासंघ**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी संबंधित महत्वाची संघटना म्हणजे अखिल भारतीय तेली महासंघ होय. अखिल भारतीय तेली महासंघाच्या माध्यमातून तेली समाजाचे संघटन करण्यात आले आहे. तेली समाजाला आरक्षण देण्यात यावे ही अखिल भारतीय तेली महासंघाची मुख्य मागणी आहे. अखिल भारतीय तेली महासंघाची संघटनात्मक यंत्रणा आहे. ही यंत्रणा प्रदेश, विभाग, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर कार्यरत आहे. अखिल भारतीय तेली महासंघाचे अध्यक्ष हे श्री जयदत्त क्षीरसागर हे आहेत.

अखिल भारतीय तेली महासंघ महाराष्ट्रात कार्यरत असला तरी त्याचा सर्वात जास्त प्रभाव बीड जिल्हयात आहे. अखिल भारतीय तेली महासंघाचे अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर हे २००९ व २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून निवडुन आले आहेत. अखिल भारतीय तेली महासंघ निवडणुकीत प्रत्यक्ष सहभागी होत नसला तरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठींबा देण्याचे काम करीत असतो.

थोडक्यात, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आपला सामाजिक पाया विस्तारण्यासाठी किंवा विविध जाती समूहांचा पाठींबा मिळविण्यासाठी विविध जातीय संघटनांशी जुळवून घेतले आहे. त्यातून त्या जातीच्या उमेदवारांना पाठींबा देणे, जातीच्या आधारावर उमेदवारी देणे, मतदारसंघाची मागणी करणे असे राजकारण त्या माध्यमातून केले जाते. जातीय अस्मिता जपून त्या जाती गटाचा पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा प्रबळ मराठा जातीचा पक्ष म्हणून ओळखला जात असला तरी इतर मराठेतर जातींचा पाठींबा मिळविण्यासाठी हा पक्ष प्रयत्नशील असून पक्षाने विविध जातींच्या संघटनांशी जवळीक साधून, त्यांच्या नेत्यांना पक्षात स्थान देवून आपला सामाजिक पाया विस्तारण्याचा प्रयत्न केला आहे.



Scanned with CamScanner

संदर्भ

१. बिरमल नितीन, (२०११),'राष्ट्रवादी कॉंग्रेस, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षांची वाटचाल', पुणे, समकालीन प्रकाशन
२. पळशीकर सुहास, (१९९८), 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण',पुणे,सुगावा प्रकाशन
३. पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास, (२०११), ' महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष',पुणे, समकालीन प्रकाशन
४. बिरमल नितीन, ;१९९९), 'प्रबळ जातीचा प्रादेशिक पक्ष : राष्ट्रवादी कॉंग्रेस', समाज प्रबोधन पत्रिका, पुणे, ऑक्टो – डिसेंबर
५. यशवंत सेना वार्षिक अहवाल २०१४
६. शिवसंग्राम परिषद वार्षिक अहवाल २०१४
७. आदिवासी विकास महासंघ वार्षिक अहवाल २०१४
८. समता परिषद वार्षिक अहवाल २०१३
९. डेरे गोरक्ष,(२०१७),राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष:विशेष संदर्भ पश्चिम महाराष्ट्र १९९९–२०१२ (अप्रकाशित शोधप्रबंध पीएच.डी.) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
१०.सिरसीकर व.म.,;२००१),'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण',पुणे,कॉन्टिनेन्टल प्रकाशन
११.पळशीकर सुहास, बिरमल नितीन, पवार प्रकाश,;२००९),'महाराष्ट्राचे राजकारण: राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ', पुणे, प्रतिमा प्रकाशन.



Scanned with CamScanner